# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

## (अधिष्ठाता यांचे कार्यालय)

**SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED**

PH NO (02446)245702/249063/249362/248430/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com


जा.क्र. वैमअं/किशाबि/दरपत्रके मागणी/ 597 /२०२२ दिनांक- 25 / ०४/२०२२

**कार्यालयीन आदेश**

विषय :-किट्स,केमीकल व ग्लासवेअर इ.साहित्यांचे दरपत्रक सादर करणे बाबत...

संदर्भ :-१.दि.२८.०४.२०२२ रोजीची खरेदी समितीची बैठक.

२.दि.२१.०१.२०२२ रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या संस्थेतील महाविद्यालयांतर्गतविविध विभागातील प्रयोगशाळेकरीता लागणाऱ्या किट्स, केमीकल व ग्लासवेअर इ.साहित्यांचे दरपत्रक खालील प्रमाणे सोबत जोडलेल्या यादीनुसार सादर करण्यात यावे.

तसेच सदर आदेशानुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक 01 /05/ २०२२ रोजी दुपारी ०५:०० वा. पर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक ०५ /०५/२०२२ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र. | साहित्यांचेनाव | नग संख्या | प्रत्येकी दर |
|---|---|---|---|
| ... | सोबत अ.क्र.०१ ते अ.क्र.१३ पर्यंतची यादी पान क्र.२ वर आहे. | एकुण १३ नग | ... |

अटी व शर्ती :-

०१.दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासन मान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र छयांकीत प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.

०२.दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, दुकान नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर,संपर्क मो.नं. नोंद असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (NA) असे नमुद करावे.

०३.दरपत्रका सोबत शासन मान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छयांकीत प्रत, सन २०२०-२१ किंवा सन २०२१- २२ मागील एक वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न (आयटीआर) प्रमाणपत्र तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रपत्र-अ नमुना पान क्र.३ वर देण्यात आलेला आहे.)

०४.दरपत्रकातील साहित्यांचे दर शासन नियमानुसार सर्व करांसहित देण्यात आलेले आहेत किंवा करांव्यतीरिक्त देण्यात आलेले आहेत याबाबत सविस्तर नोंद करण्यातयावी. तसेच सर्व साहित्यांचे दर बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये. तसेच सर्व साहित्य स्वतः स्वखर्चाने दहा दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही. मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांका पासुन सहा (०६) महिण्यांपर्यंत वैध राहतील.

०५.प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

०६.पुरवठा करण्यात येणारे साहित्य शासन मान्यता प्राप्त नामांकीत कंपनीचे व पुढील एक किंवा दोन वर्ष वैध कालावधीचे व चांगल्या प्रतीचे असावे. हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश तात्काळ रद्द करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.

०७.तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरन नाकारण्यात येतील तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदीबाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.

०८.सदर आदेशान्वये या कार्यालयाने मागणी केलेले प्रमाणपत्रच दरपत्रकासह सादर करण्यात यावे अन्यथा इतर कागदपत्र सादर केल्यास सदर दरपत्रक रद्द करण्यात येईल व याबाबत लेखी किंवा मौखीक स्वरुपात कळविण्यात येणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदर बाबींचे दरपत्रक सादर करावे.

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकिय महाविद्यालय,अंबाजोगाई.

प्रत:- १.संस्थेची वेबसाईट ,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म.अंबाजोगाई या संस्थेतील शरीरविकृतीशास्त्र विभागातील प्रयोगशाळेकरीता खालील यादी प्रमाणे किट्स,केमीकल,ग्लासवेअर व इ.किरकोळ साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यात यावे.

| | शरीरविकृतीशास्त्र विभाग | | |
|---|---|---|---|
| Sr.no. | Items name | Packing size | Rate per packing |
| 01 | ER Antibody | 06 ml / 01 Bottal | |
| 02 | PR Antibody | 06 ml / 01 Bottal | |
| 03 | HER 2 NEU | 06 ml / 01 Bottal | |
| 04 | HRP kit (HYDROGEN PEROXIDE BLOCK,TARGET BINDER,HRP,DAB BUFFER,DAB CHROMOGEN) | 01 pack | |
| 05 | PAP PEN BIG | 01 pack | |
| 06 | HYDROPHIC POSITIVE CHARGED SLIDES | 02 pack | |
| 07 | DEPARAFFINIZATION SET | 01 pack | |
| 08 | HUMID Chember | 01 pack | |
| 09 | MEDONIC CELL COUNTER (M Series Diluent 20 liters) | 01 pack | |
| 10 | MEDONIC CELL COUNTER (M Series LYSE 05 liters) | 01 nos. | |
| 11 | EDTA Buffer 50 x | 500 ml/01 pack | |
| 12 | Immuno Wash Buffer 25 x | 500 ml/01 pack | |
| 13 | Citrate Buffer 50 x | 500 ml/01 pack | |

**Dean**
**S.R.T.R.G.M.C. Ambajogai**

# प्रपत्र- अ

## निविदाकारांनी द्यावयाचा हमीपत्राचा नमुना

प्रमाणित करण्यात येते की, मी / आम्ही आमची संस्था ............................................ या पत्रान्वये हामी देतो की, आमचा खरेदी प्राधीकारी बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/ आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेण्याऱ्या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.तरी याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

ठिकाण :-

नाव :-

पत्ता :-

मो.नं. :-